# कांदा विकल्याची पट्टी देता का कोणी पट्टी?
# आडत्यांसह प्रशासनाने शेतकऱ्यांची लावली चेष्टा

✔ सोलापूर/विष्णू सुरवसे

‘माल विकताच रोख पट्टी’ असा डांगोरा सोलापूरच्या कृषी बाजार समितीने महाराष्ट्रासह शेजारच्या आंध्रप्रदेश अन् कर्नाटकात पिटला. यातून माल उत्पादक शेतकऱ्यांना या बाजार समितीत माल आणण्याबद्दल आकृष्ट करण्यात आले. मात्र, जाहिरातींच्या माध्यमातून पिटलेला हा डांगोरा शेतकऱ्यांची दिशाभूल करणारा फसवा असल्याचा प्रत्यय शेतकऱ्यांना येत आहे. तीन महिन्यांपूर्वी कांदा विकलेल्या शेतकऱ्यांना पट्टीचे पैसे मिळत नाहीत. शेतकऱ्यांनी बाजार समितीकडे संबधित आडत व्यापाऱ्यांच्या विरोधात तक्रारी केल्या मात्र त्यांना न्याय मिळत नाही. यावरुन याप्रकरणी दोषी आडत व्यापाऱ्यांना पाठिशी घालण्याची संशयास्पद भूमिका बाजार समिती प्रशासनाची आहे का? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. शिवाय शेतकऱ्यांना त्यांच्या कांद्याची पट्टी न देता त्यांची चेष्टा करण्याच्या फसव्या आडत व्यापाऱ्यांना बाजार समितीच्या काही संचालकांचा वरदहस्त असावा, अशीही शंका उपस्थित केली जात आहे.

- बाजार समिती प्रशासनाची संशयास्पद ठरतेय भूमिका
- फसव्या अडत्यांना संचालकांचा वरदस्त असल्याची चर्चा
- कांदा विक्रीचे पैसे देण्याचे सगळे वायदे संपले
- जिल्हाधिकारी आणि जिल्हा उपनिंबधक कार्यालयदेखील ठरतेय कुचकामी



## ‘माल विकताच रोख पट्टी’ खोटा डांगोरा



फेब्रुवारी, मार्च आणि एप्रिल मध्ये विकलेल्या कांद्याची अजूनही बिल मिळत नसल्याने कांदा उत्पादक शेतकरी व्यापारी आडतदार बाजार समिती प्रशासन आणि डीडीआर कार्यालय यांच्याकडे हेलपाटे मारत आहेत. या संबंधित शेतकऱ्यांना त्यांच्या पट्टीचे पैसे देण्यासंबंधी जे वायदे करण्यात आले, ते वायदे संपले आहेत. सोलापूर परिसरातील काही शेतकऱ्यांनी कांदा विकून ४ ते ५ महिने होत आले. बिले मिळत नसल्याच्या तक्रारींवर कारवाई करण्यात येत आहे, असे उत्तर प्रशासन विभागातून मिळत होते. बिल मिळावे म्हणून काही शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या कार्यालयात निवेदन दिले. चौकशी करून बिल मिळण्यासंदर्भात कारवाई करू असे आश्वासन देण्यात आले. पण अजूनही कोणत्याही प्रकारची कारवाई होत नाही.

> “ कांदा विकल्याची पट्टी दोन ते तीन दिवसात मिळेल असे प्रशासन सांगत आहे. चार ते पाच महिने वाट पाहिली आहे. बिल मिळेल अशी आशा आहे. मात्र बिल काही मिळेना. बिल मिळण्याची वाट पाहून मी आता थकलो आहे.
>
> **- तानाजी क्षीरसागर, कांदा उत्पादक शेतकरी देगाव, ता. उत्तर सोलापूर**

> “ बाजार समितीत कांदा विकूल ४ महिने झाले असून आज पर्यंत लेखी व तोंडी तक्रार प्रशासन विभागाला केली आहे. पण अजूनही बिल मिळाले नाही
>
> **-बसवेश्वर सुपेकर, कांदा उत्पादक शेतकरी, कारंबा, ता. उत्तर सोलापूर**

> “ ५ ते ६ व्यापारी हे आडत व्यावसाय पार्टनरशिपमध्ये करीत असल्याचे समजते. माझ्याकडे २० ते २२ तक्रारी आल्या आहेत.त्यांची चौकशी चालू आहे.
>
> **- नामदेव शेजाळे. कांदा विभाग प्रमुख, बाजार समिती**

### सचिव सूर्यवंशींकडून मिळेना प्रतिसाद

कांदा विक्रेत्यांच्या लाखो रुपयांच्या पट्ट्या मिळत नसल्याच्या शेतकऱ्यांच्या तक्रारींची दखल घेण्याची जबाबदारी बाजार समितीचे प्रशासन प्रमुख म्हणून सचिव दत्तात्रय सूर्यवंशी यांची आहे.त्यांच्याशी अनेक वेळा भ्रमणध्वनीवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्याकडून प्रतिसाद मिळत नसल्याची माहिती पुढं येत आहे.

### पॉकेट संस्कृती कारवाईला येतेय का आड?

वास्तविक बाजार समितीमध्ये माल घेऊन येणाऱ्या शेतकऱ्यांच्या फसवणूकप्रकरणी बाजार समितीनंतर सहकारी संस्थांचे जिल्हा उपनिंबधक कार्यालय यांची जबाबदारी आहे. मागच्या पाच महिन्यांपासून कांद्याची पट्टी मिळत नसलेल्या शेतकऱ्यांनी या कार्यालयाकडे तक्रारी केल्या. पण कारवाई होऊन त्या शेतकऱ्यांना न्याय मिळत नाही.बाजार समितीमधून येणाऱ्या पॉकेट संस्कृतीमुळेच कारवाईला अडसर होतोय का? अशी चर्चा सुरु आहे.

### गुन्हे दाखल करण्याप्रकरणी बाजार समितीचे नमते का?

बाजार समितीत आणून विकलेल्या मालाची पट्टी संबंधित शेतकऱ्यास मिळण्यासंबंधी व्यापारी किंवा आडतदार यांच्याकडून अडवणूक होत असेल, पट्टी मिळत नसेल तर संबंधित व्यापारी किंवा अडतदारावर थेट पोलिसांत गुन्हा दाखल करण्याचा पणन कायदा आहे. शिवाय संबंधित आडतदाराचा परवाना निलंबीत करण्याचा अधिकारदेखील बाजार समितीच्या सचिवांना आहेत. सोलापूर बाजार समितीच्या सचिव सूर्यवंशी यांच्याकडून गुन्हे दाखल करण्यासह परवाने निलंबीत करण्याची कारवाई का होत नाही. कारवाईसंबंधी त्यांची भूमिका नमती का आहे? कारवाई करु नये, असा त्यांच्यावर दबाव आहे की? त्यांची मानसिकता कारवाई करण्याची नाही हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# शहर ‘मध्य’ला आडम मास्तरांचा सवतासुभा
# काँग्रेस जागा सोडणार नसल्याचं केलं वक्तव्य

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**लोकसभा निवडणुकीचा निकाल गुलाल उधळण्यापूर्वीच माजी आमदार नरसय्या आडम यांची आता भाषा बदलली असून त्यांनी काँग्रेसवर खळबळजनक आरोप करत या पक्षाचं वस्त्रहरण केले. याशिवाय इंडिया आघाडी आपल्याला शहर मध्यची जागा सोडेल या भ्रमात कार्यकर्त्यांनी राहू नये. मी आगामी विधानसभा निवडणूक लढवणार आहे, कार्यकर्त्यांनी आतापासूनच कामाला लागावे, असे आवाहन मास्तर यांनी केले आहे.**

- ▶▶ विजयाच्या गुलालाआधीच कडाडले माजी आमदार नरसय्या
- ▶▶ काँग्रेसचे केले वस्त्रहरण; महाआघाडी फुटीच्या वाटेवर



### लाल झेंड्याला विकत घेणारा माणूस जन्माला आला नाही

माजी आमदार आडम म्हणाले, लोकसभा निवडणुकीत माकपने काँग्रेसकडून एक रुपयाही न घेता प्रामाणिकपने काम केले आहे. काँग्रेसवाले माझ्याकडे लाखो रुपये घेऊन आले होते. मात्र, लाल झेंड्याला विकत घेणारा माणूस अजून जन्माला आला नाही. कोणाचाही एक रुपया न घेता माकपच्या कार्यकर्त्यांनी स्वाभिमान दाखवत लाल झेंड्याला खऱ्या अर्थाने सलामी दिली आहे.

### इंडिया आघाडीचे कट कारस्थान आतापासूनच सुरू

विधानसभेची निवडणूक येत्या ऑक्टोबर महिन्यामध्ये होण्याची शक्यता आहे, त्यामुळे इंडिया आघाडी आपल्याला जागा सोडेल, या भ्रमात राहू नका. आतापासूनच त्यांचे कट चालू आहेत. आपल्या ताकदीवर विधानसभेसाठी सोलापुरातून आपला झेंडा फडकावा लागणार आहे, असे सांगून आडम मास्तर यांनी विधानसभा लढण्याची घोषणा केली.

दरम्यान, त्यांच्या या वक्तव्यानं महाआघाडीत फुट पडणार असल्याचे स्पष्ट संकेत आडम यांनी दिले. शिवाय सोलापूर शहर मध्यच्या साम्राज्यात विधानसभा निवणडणुकीचा सवतासुभा निर्माण करण्याचे त्यांनी आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना जणू फर्मान सोडले.

सोलापुरातील सीटूच्या वर्धापन दिन कार्यक्रमात कार्यकर्त्यांना संबोधित करताना माजी आमदार आडम बोलत होते.लोकसभा निवडणुकीत काँग्रेसवाले माझ्याकडे लाखो रुपये घेऊन आले होते. पण, माकपच्या कार्यकर्त्यांनी एक रुपयाही न घेता प्रामाणिकपणे काँग्रेस पक्षाचे काम केले आहे, असा दावा आडम यांनी केला आहे. लोकसभा निवडणुकीत आडम यांनी काँग्रेसच्या उमेदवार आ. प्रणिती शिंदे यांना सशर्त पाठिंबा जाहीर केला होता. सोलापूर शहर मध्य मतदारसंघ हा आगामी विधानसभा निवडणुकीत माकपला सोडावा, अशी मागणी केली होती.



# एस.टी. गाड्यांना लवकरच सीएनजी कीट

## बसेस्चं आता धूर ओकत धावणं थांबणार

✔ सोलापूर/प्रतिनिधी

राज्य परिवहन मंडळाच्या एसटी बसेस आता धूर ओकत धावणार नाहीत. एसटी बसेस्ना सीएनजी किट बसले जाणार आहे. यामुळे डिझेल खर्चात बचत होण्यासह पर्यावरणाचा ऱ्हासही थांबणार आहे.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने प्रदूषणमुक्त व पर्यावरणाचा विचार करून एसटी गाड्यांना सीएनजी कीट बसवण्याची पावले उचलली आहेत. डिझेलच्या वाढत्या किमतीमुळे हा निर्णय घेतल्याने डिझेलचा खर्च ही कमी होणार आहे. येत्याा काही दिवसांमध्ये एसटी महामंडळाच्या एक हजार गाड्यांचे रूपांतर सीएनजी गाड्यांमध्ये होणार आहे. या रूपांतरमध्ये सोलापूर विभागाच्याही काही गाड्या असणार आहेत. यामुळे सोलापूर विभागामध्ये सीएनजी किटमुळे डिझेलवरील खर्च कमी होणार आहे. तसेच पर्यावरणाचा ऱ्हासदेखील कमी होणार आहे.

राज्य परिवहन महामंडळाचा प्रवास ई बसनंतर यापुढे सीएनजीच्या दिशेने होणार, सोलापूर विभागात नऊ डेपो पडतात, यामध्ये सोलापूर, अकलूज, सांगोला, मंगळवेढा, बार्शी, पंढरपूर, करमाळा, असे आहेत. एकूण सोलापूर विभागात ७०९ गाड्या आहेत. यामध्ये ९ गाड्या इलेक्ट्रिक आहेत. सोलापुर मधील नऊ डेपोना साधारणता रोज किमान ४५ हजार लिटर डिझेल लागतं. वाढत्याा डिझेलच्या खर्चामुळे हा सीएनजीचा निर्णय घेतला आहे.

# अहिल्यादेवींच्या पुरोगामी कार्याचा जागर आवश्यक

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**मुख्यत्वे, धनगर समाजासह अन्य समाजांमध्ये श्रद्धेचे स्थान असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे आणि सोलापूर जिल्ह्याचे नाते संबंध स्नेहाचे राहिल्याचा इतिहासात उल्लेख आढळतो. या जिल्ह्याच्या परिसरात अहिल्यादेवींच्या पाऊलखुणा असल्याचे त्यांच्या व्यक्तीमत्त्वासंदर्भात अभ्यास केलेल्या तज्ज्ञांचे मत आहे. दरम्यान, अहिल्यादेवींच्या पुरोगामी कार्याचा जागर होणे आवश्यक आहे. आज पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांची जयंती आहे, त्या निमित्तानं त्यांच्या कार्यावर दैनिक ‘सुराज्य’नं टाकलेला हा प्रकाशझोत.**

## ● सोलापूर जिल्ह्यात अहिल्यादेवींचे अतुलनीय कार्य
## ● गिरणगाव परिसरात होळकरांच्या पाऊलखुणा

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती विशेष**

इंदौरच्या महाराणी अहिल्यादेवी होळकर यांनी अखंड हिंदुस्थानभर पुण्यकर्म केले. १२ ज्योतिर्लिंगांचा जिर्णोद्धार केला. सोलापूर, पंढरपूर, तुळजापूर, बोहाळी, नातेपुते, चोराखळी, चौंडी इत्यादी ठिकाणी अहिल्यादेवी यांनी मंदिरांचा जिर्णोद्धार करुन लोकहिताची कामे केली. विशेषत: विहिरी, घाट, तलाव बांधून लोकांच्या पिण्याच्या पाण्याची सोय केली. मंदिर बांधून दररोज पूजेची व्यवस्था केली. अहिल्यादेवी होळकर यांनी केवळ मंदिरांच्या जिर्णोद्धारच केला असे नाही तर विहिरी, घाट, तलाव, वृक्षारोपण अशी लोकहिताची कामेदेखील केली.

सोलापूर-छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील येडशीजवळ चोराखळी हे छोटे गाव असून या गावात आजही अहिल्यादेवी होळकर यांच्या अजोळचे मैदाड-पाटील घराणे यांचे जुने वाडे साक्ष देत आहेत. अहिल्यादेवी होळकर यांच्या आजी कृष्णाबाई बाळाजी पाटील यांची समाधी आहे.

चोराखळी येथे पापनाश मंदिर असून या मंदिरात छोटी अहिल्या पूजेसाठी जात होती, अशा आठवणी ज्येष्ठ नागरिक सांगतात.

पिण्याच्या पाण्यासाठी अहिल्यादेवी होळकर यांनी देशभर विहिरी, घाट बांधले असून तुळजापूर येथे दगडी विहिर बांधण्यात आली होती. ही विहिर साक्ष देत आहे. या विहिरीजवळ जुन्या काळातील दगडी मोटदेखील उपलब्ध आहे.

पंढरपूर येथे वारकऱ्यांसाठी विठ्ठल मंदिरासमोर चंद्रभागा नदीच्या काठावर होळकरवाडा बांधला. १७६७ साली हा वाडा बांधण्यात आला असून या वाड्यात २५ खोल्या आहेत. पंढरपूर जवळच बोहाळी या गावी लोकांच्या पिण्याच्या पाण्याची सोय करण्यासाठी अहिल्यादेवी होळकर यांनी विहिर बांधली आहे. या विहिरीत आजही भरपूर पाणी आहे. पंढरपूर-नातेपुते या पालखी मार्गावर वारकऱ्यांना पाण्याची सोय व्हावी यासाठी नातेपुतेजवळ दोन विहिरी बांधल्या असून आजही या विहिरींचे पाणी लोक वापरतात.

> “ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी मध्ययुगीन कालखंडामध्ये सुशासन आणि लोककल्याणकारी प्रशासनाची बीजे रोवून आधुनिक भारताचा पाया हा अध्यात्मक विज्ञान आणि समानतेच्या आधारित राहील हा घालून समाजामध्ये आदर्श बाळगा.
>
> **-प्रा. प्रभाकर कोळेकर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर**

> “ अहिल्यादेवींच्या कार्याचा राज्य कारभार उत्कृष्ट होता. २८ वर्ष त्याांनी राज्यकारभार चालवला. त्यांच्या कालखंडात न्यायव्यवस्था प्रशासन व्यवस्था उत्तम होती. पारदर्शक राज्यकारभार होता. अहिल्यादेवी यांचे देशभरातून कौतुक केले जाते. अहिल्यादेवींच्या पुरोगामी कार्याचा जागर होणे आवश्यक
>
> **-उज्वलकुमार माने, अभ्यासक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर तथा साहित्यीक**



